महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)
कामगार, औद्योगिक संबंध व कर्मचारी कल्याण विभाग,
प्रकाशगंगा प्लॉट सी-१९, ई-ब्लॉक ४ था मजला, वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
Email : ciro@mahatransco.in website : www. mahatransco.in दूरध्वनी क्र. २६५९५०४३ / २६५९५०६४
C.I.N.No. U40109MH2005SGC153646

जा. क्र. मराविपाकं/का.औ.सं.क.वि/कोसक/४४७९ दि. २९.१०.२०२०

# परिपत्रक

**विषय :-** COVID-१९ मुळे प्रभावित झालेल्या / होत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी सांघिक कार्यालय व परिमंडल कार्यालय स्तरावर 'COVID-१९ सहाय्यता कक्षाची' स्थापना करणेबाबत

महाराष्ट्रामध्ये कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव गेल्या अनेक दिवसांपासून मोठया प्रमाणात वाढत चालला आहे. सदर विषाणूच्या प्रादुर्भावामुळे महापारेषण कंपनीच्या सांघिक कार्यालयातील तसेच परिमंडल, मंडळ कार्यालयातील अनेक अधिकारी / कर्मचारी बाधित झालेले आहेत / होत आहेत. त्यामुळे ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर अशी वेळ आल्यानंतर त्यांना तात्काळ सहाय्य मिळावे, यासाठी कोविड-१९ मुळे प्रभावित झालेल्या / होत असलेल्या कर्मचारी यांच्यासाठी सांघिक कार्यालय व परिमंडल कार्यालय स्तरावर स्वतंत्र 'COVID-१९ सहाय्यता कक्ष' स्थापन करणेबाबतची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती.

२. याबाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन), कार्यकारी संचालक (मासं) व मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन, सांघिक कार्यालय व परिमंडल कार्यालय स्तरावर स्वतंत्र 'COVID-१९ सहाय्यता कक्ष' स्थापन करणेबाबत मंजूरी दिली आहे.

३. त्या अनुषंगाने परिमंडल कार्यालय स्तरावर स्वतंत्र 'COVID-१९ सहाय्यता कक्ष' स्थापन करुन सदर कक्षाचे कामकाज पाहण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी. तसेच, 'COVID-१९ सहाय्यता कक्षाची' कार्ये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात यावीत.

**सांघिक कार्यालय COVID-१९ समिती :**

- मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, अध्यक्ष
- सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं), सदस्य
- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), सदस्य

**परिमंडल कार्यालय COVID-१९ समिती :**

- सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं), अध्यक्ष
- कार्यकारी अभियंता (प्रशासन), सदस्य
- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), सदस्य

**समितीच्या कामकाजाची कार्यकक्षा :**

१. COVID-१९ विषाणूचा प्रादुर्भाव झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना रुग्णवाहिका तातडीने उपलब्ध करुन देण्यास सहकार्य करणे.

२. नजिकच्या COVID-१९ रुग्णालयाशी तातडीने संपर्क करुन रुग्णास दाखल करुन घेण्याबाबत सहकार्य करणे.

३. म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनीच्या Group Mediclaim Insurance Policy मधून कॅशलेस सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रुग्णालयातील TPA विभागाशी संपर्क करुन सहकार्य करावे.

४. कर्मचाऱ्यास रुग्णालयात काही प्रमाणात अग्रीम रक्कम रोख स्वरुपात जमा करावी लागत असल्याने, त्याला कंपनीच्या परिपत्रकाप्रमाणे अग्रीम रक्कम तात्काळ मंजूर करुन देण्याबाबत सहकार्य करणे.

५. COVID-१९ या आजारासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी (CPF Trust) यांच्याकडून कर्मचाऱ्यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीतून तीन महिन्याचे मूळ वेतन + महागाई भत्ता अशी मिळून येणारी रक्कम Non-Refundable (NR) Advance म्हणून मिळत असल्याने कर्मचाऱ्याला आवश्यक असल्यास उपलब्ध करुन देण्याबाबत मदत करणे.

६. COVID-१९ च्या प्रादुर्भावामुळे एखाद्या कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसास परिपत्रक क्र. मराविपाकंम/काऔसंककवि/कोविड-१९/सानुग्रह सहाय्य/२२८८, दि.१९.०६.२०२० अन्वये सानुग्रह सहाय्य मंजूर करण्याबाबतचे योग्य ती कार्यवाही करावी.

सदर परिपत्रक कंपनीच्या सिंहद्वारावर (ep.mahatransco.in) उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

शिंदे २९/१०/२०

(मंगेश शिंदे)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

प्रति,
महापारेषण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाच्या सर्व अधिकाऱ्यांना माहिती व उचीत कार्यवाहीस्तव.